# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**स्वाधार योजना सूचना** दि.1/2/2023

---

**शै.वर्ष**. 2022-23 मधील S.C. संवर्गातील विद्यार्थ्यांना सूचीत करण्यात येते की, जे विद्यार्थी शासकीय वसतीगृहात प्रवेशास पात्र असून प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी शासनाच्या **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा** ऑनलाईन फॉर्म http://syl.mahasamajkalyank.in या वेबसाईड भरून आवश्यक कागदपत्रे जोडून **दि.** 25/02/2023 पुर्वी **सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, डालडा फॅक्टरी, मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोर, लातूर** येथे जमा करावेत.

सदरील योजनेची सविस्तर माहिती कार्यालयासमोरील शिष्यवृत्ती नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. संबंधीत विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

1.2.23

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
(स्वायत्त), लातूर

# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय लातूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुनी डालडा फॅक्टरी, मार्केट यार्ड शिवनेरी गेटसमोर लातूर
Email : acswlatur@gmail.com दुरध्वनी क्र. ०२३८२-२५८४८५

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०२२-२३ करीता नवीन व नुतनीकरण अर्ज करण्यासाठी जाहीर प्रसिध्दी निवेदन.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असुन प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरीत करण्यासाठी दि. १३ जून २०१८ रोजीच्या शासन निर्णया अन्वये (शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१८/प्र.क्र. २१३/ शिक्षण-२, दि.१३/०६/२०१८) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबवण्यात येत आहे.

**लाभाचे स्वरुप :** सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये खालीलप्रमाणे रक्कम थेट वितरीत करण्यात येणार आहे.

| अ क्र | खर्चाची बाब | लातूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये तसेच लातूर महानगरपालिकेच्या हद्दीपासून ०५ कि.मी. परिसरात असलेली महाविद्यालये / शैक्षणिक संस्था या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | २५,०००/- |
| २ | निवास भत्ता | १२,०००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | ६,०००/- |
| | प्रति विद्यार्थी एकूण देय रक्कम | ४३,०००/- |

टीप : वरील रकमेव्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रति वर्ष रु.५०००/- व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष रु.२०००/- इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी ठोक स्वरुपात देण्यात येईल.

**सदर योजनेचा लाभ घेण्यासाठीचे निकष :**

१. विद्यार्थी अनुसुचित जाती व नवबौध्द या प्रवर्गातील असावा. २. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. ३. विद्यार्थ्याने जिल्हास्तरावरील सामाजिक न्याय विभागाच्या कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे आवश्यक आहे परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नसावा. ४. शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असलेल्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला असावा. ५. विद्यार्थ्यास इयत्ता १०वी / ११वी/१२वी/पदवी/पदविका मध्ये किमान ५०% पेक्षा जास्त गुण असणे अनिवार्य आहे. ६. या योजनेमध्ये दिव्यांग (अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील) विद्यार्थ्यांसाठी ३% आरक्षण असेल व गुणवत्तेची मर्यादा ४०% असेल. ७. विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २.५० लाखापेक्षा जास्त नसावे. ८. विद्यार्थ्याने ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे तेथील तो स्थानिक रहिवासी नसावा. ९. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लातूर महानगरपालिका क्षेत्रामध्ये असलेली महाविद्यालये तसेच लातूर महानगरपालिका हद्दीपासून ०५ कि.मी.च्या परिसरात असलेली महाविद्यालये यामध्ये शिक्षण घेत असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीच अर्ज सादर करावा. १०. विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे तो अभ्यासक्रम हा ०२ वर्षापेक्षा कमी कालावधीचा नसावा. ११. विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती ७५ टक्केपेक्षा जास्त असणे बंधनकारक असेल.

*** अर्जाचा नमुना, आवश्यक कागदपत्रे व संकेतस्थळ**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी http://syl.mahasamajkalyan.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पदध्दतीने अर्ज भरण्यात यावा व सदर अर्जाची एक प्रत सहाय्यक आयुक्त कार्यालयातील स्वाधार योजनेच्या शाखेकडे जमा करण्यात यावी.

योजनेच्या अटी व शर्ती तसेच अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्राची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

*** नवीन व नुतनीकरणाचे अर्ज सादर करण्याचे ठिकाण व अंतिम दिनांक:-**

पात्र विद्यार्थ्यांनी आपला अर्ज वरील संकेतस्थळावर दि. २८/०२/२०२३ पर्यंत ऑनलाईन भरुन त्याची प्रत दि. २८ / ०२ /२०२३ पर्यंत (कार्यालयीन वेळेपर्यंत) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुनी डालडा फॅक्टरी, मार्केट यार्ड शिवनेरी गेटसमोर, लातूर येथे समक्ष सादर करावी. अधिक माहितीसाठी ७४९८६७१७९२ या दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयाशी संपर्क साधावा.

(टीप:-अपूर्ण भरलेले/आवश्यक कागदपत्रे सादर न केलेले अर्ज रद्द समजण्यात येतील व अपात्र, त्रूटी असलेल्या विद्यार्थ्यांना वेगळे कळविण्यात येणार नाही.)

- स्वाक्षरीत -

**(शिवकांत चिकुर्ते)**
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण लातूर